# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१० ऑगस्ट,२०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस सश्रम कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत फिर्यादी अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस ०९/०८/२०१९ रोजी **श्रीमती अंसारी, जिल्हान्यायाधीश क्र. ०१ चंद्रपुर यांनी सश्रम कारावासाची** शिक्षा ठोठावली आहे.

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत दिनांक ०५/०९/२०१५ रोजी यातील फिर्यादी मुलगी ही दैनंदीनप्रमाणे शिक्षणसाठी पॉलीटेक्नीक कॉलेज येथे गेली होती. आपल्या मैत्रीणींसोबत वर्गात बसुन असतांना यातील आरोपी नामे सचिन महादेव लेडांगे वय २६ वर्ष रा. टिळक नगर वार्ड बल्लारशाह याने सर्वांसमोर तिचा हात पकडुन तिला अश्लील शब्दात बोलुन फिर्यादी मुलीचा विनयभंग केला आणि मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप. क्र. ४३८/२०१५ कलम ३५४(ब)(ड)ए ५०६ भादंवि सहकलम ८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन मपोउपनि श्रीमती संगीता कदम, पोलीस स्टेशन रामनगर यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०९/०८/२०१९ रोजी **आरोपी नामे सचिन महादेव लेडांगे वय २६ वर्ष रा. टिळक नगर वार्ड बल्लारशाह,** यास कलम ३५४(ब) भादंवि सहकलम ८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ४,०००/—रू दंडाची शिक्षा **श्रीमती अंसारी, जिल्हान्यायाधीश क्र. ०१ चंद्रपुर** यांनी ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. राजु सबळ पोस्टे रामनगर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
१० ऑगस्ट,२०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# शहिद दिनानिमीत्त शहीद शंकर भोसले बहुद्देशीय सभागृहाचे उद्घाटन

निसर्गाने नटलेल्या हिरवळ शांतते मध्ये, सोनेरी सुर्याच्या साक्षीने जेव्हा निर्रभ्र आकाशाकडे २१ तोफांच्या फैरी झाडल्या जातात तेव्हा नक्कीच वीर भुमीपुत्रांचे बलीदान प्रत्येकाच्या काळजात घर करून जाते. अशा या शुर शहिदांच्या बलीदानाची आठवण करीत त्यांना आंदराजंली देण्याचा अद्वितीय सोहळा आज दि. १० ऑगष्ट २०१९ रोजी जिवती तालुक्यातील मारई पाटण येथे पार पडला.

१० ऑगस्ट, १९८९ रोजी मारई पाटण येथे नक्षवाद्यांच्या भ्याड हल्यात ०१ पोलीस अधिकारी व ०७ कर्मचारी शहिद झाले होते. ‘ शहिद स्मारक ’ मारईपाटण ता. जिवती येथे दरवर्षी १० ऑगस्ट हा दिवस **‘शहिद दिन’** म्हणुन आयोजित करण्यात येतो. आज रोजी २१ फैरींची सलामी देवुन श्रध्दाजंली वाहण्यात आली. परिसरातील नागरीकांना लहान मोठे कार्यक्रम आयोजीत करता यावे या दृष्टीने व शहीदांच्या स्मृतीस उजाळा असावा याकरीता शहीद पोलीस उपनिरिक्षक यांचे नावे **“शहीद शंकर भोसले बहुउददेशीय सभागृह”** पोलीस विभागाच्या वतीने तयार करण्यात आले असल्याने शहिद दिनाचे औचित्य साधुन भव्य अशा सभागृहाचे आज रोजी मान्यवरांच्या व शहीदांचे कुटुंबीय यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. कार्यक्रमादरम्यान शहीदांचे कुटुंबीय हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांचा सम्मान पोलीस दलाचे वतीने करण्यात आला. तसेच मारई पाटण येथील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेच्या तयारी करीता पुस्तकांचे वाटप व खेळाचे साहित्य सुध्दा वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणुन मा. श्री. देवराव भोंगळे अध्यक्ष जिल्हा परिषद चंद्रपुर, मा. ॲड. संजय धोटे, आमदार राजुरा विधानसभा क्षेत्र, मा. श्री. सुरेश केंद्रे, मा.श्री. महेश देवकते, पंचायत समिती सदस्य, मा.श्री. देवराव कोटनाके सरपंच, मारई पाटण, पोलीस पाटील, पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक गृह श्री. शेखर देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकार गडचांदुर श्री. विलास यामावार, ठाणेदार टेकामांडवा श्री. अविनाश मेश्राम व जिवती, पाटण, भारी, पिट्टीगुडा, गडचांदुर व कोरपणा या पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करतांना चंद्रपुर पोलीस दलाने अगदी कमी दिवसात पुर्णत्वास आणलेल्या सभागृहाच्या कामाबदद्ल तसेच चंद्रपुर पोलीस करीत असलेल्या कामगीरी बदद्ल गौरव उद्गार काढले. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांनी आपले प्रास्ताविक करतांना सांगीतले की, नक्षलवाद संपविण्याकरीता पोलीस दल नेहमीच सज्ज असते. परंतु जनतेचे सहकार्य त्याकरीता आवश्यक आहे. प्राप्त होणाऱ्या सुरक्षा विषयक खर्चा मधुन नक्षलग्रस्त भागातील जनतेकरीता वेगवेगळे उपक्रम राबविण्याकरीता चंद्रपुर पोलीस दल नेहमीच तत्पर असल्याचे त्यांनी सांगीतले. सदर कार्यक्रमाकरीता मोठया संख्येने आजुबाजुच्या गावातील नागरीक आणि शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे ठिकाणी ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतीक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोना. संतोष पानघाटे यांनी करून आभार प्रदर्शन सपोनि. खैरकर ठाणेदार जिवती यांनी केले.

---